# क्रांतिकारी विद्यार्थि ते गुरिल्ला जनयोध्दा!



**शोषीत जनतेचा लाडका सुपुत्र**
**अमर शहीद कॉम्रेड कृष्णा**
**यांना लाल सलाम!**

# शोषीत जनतेचा लाडका सुपुत्र अमर शहीद कॉमरेड कृष्णा यांना लाल सलाम!

शोषीत जनतेचा लाडला सुपुत्र ज्याने शेवटच्या स्वासापर्यंत जुलुमी शाशन व्यवस्थे विरुध्द झुंज दिली, प्राण अर्पण केले पण हातातली सेल्फ लोडेड राईफल सोडली नाही. आपल्या अमरत्वाव्दारे तो जणू जनतेला सांगत होता कि ‘सशस्त्र संघर्षा शिवाय दुसरा पर्याय नाही’. ‘जनते जवळ जनसेना नाही तर काहीच नाही!’ मृत्यू तर सर्वांनाच येते  पण जो जनतेसाठी बलिदान करतो त्याचा मृत्यू हिमालयाहुनही मोठा असतो. कॉमरेड कृष्णा भारतीय क्रांतिच्या ईतिहासातील सोनेरी पान बणून मृत्यूंजयी  झाला.

**कॉमरेड कृष्णा:** कॉ. कृष्णा उर्फ राजू ठाकूर, राहणार इंदिरा नगर, राजूरा जिल्हा चंद्रपूर. वयाच्या अवघ्या 27 व्या वर्षी भारताच्या नवजनवादी क्रांति लढ्यात शहीद झाला. त्याने आपल्या अल्पशा क्रांतिकारी जीवनात

अविस्मरणीय ठसा उमटविला. दृढसंकल्प, कठोर मेहनत, सतत आंतरीक व बाह्य अंतर्विरोधात संघर्षशिल राहणे, जनतेशी प्रेम व प्रत्येक कामात पुढाकार घेणे अश्या मुल्यवान गुणाची प्रेरणा देवून गेले.

कॉ. कृष्णा भारताची कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) चे सदस्य होते. त्याचप्रमाणे ते पार्टीच्या नेतृत्वात असलेल्या 'पिपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी' म्हणजेच पी.एल.जी.ए. च्या प्लाटून 56 चे सेक्शन डेप्यूटी कमांडर होते. दिनांक 12 आगस्ट 2014 ला गडचिरोली जिल्हयातिल खोब्रामेंडा जंगलात दबा धरुन बसून असलेल्या पोलीसांशी झालेल्या युध्दात ते शहीद झाले.

कॉ. कृष्णा आणि कॉ. सोनू पी.एल.जी.ए. च्या प्लाटून 55 चे सेक्शन डेप्यूटी कमांडर व अन्य तिन असे पाच कॉमरेड नाडेकल गावात गावकऱ्यांचा निरोप घेऊन आपल्या निश्चित स्थळी वापस जात होते. येवढ्यात त्यांना शत्रुचा सुगावा लागला. लगेच कृष्णाने सर्वांना अलर्ट केले व स्वतः एसएलआर अलर्ट पोजीशन मध्ये करुन सोनू सोबत हुशारीने चेकिंग करु लागला. लागलिच फायरींग चालू झाली. शत्रुने दोन बाजूने फायरींग केली.

कृष्णा व सोनू दोघेही पोजीशन घेवून लढत असतांनाच शेकडोंच्या संख्येने असलेल्या पोलिसांनी घेरले व दोघांचीही निघृण   हत्या केली. जेंव्हा हे दोन्ही कॉमरेडस् पोलीसांच्या जाळ्यात पूर्णपणे सापडले असतांनाही त्यांना जिवंत न पकडता त्यांना ठार करण्यात आले.

क्रांतिकारींची हत्या करणे हे महाराष्ट्र सरकारचे ध ोरण आहे. इथे कायद्याचे राज्य नसून पोलीसांचे राज्य आहे. राजकीय विरोधकांना पोलीसां करवी ठार करुन चकमकीत ठार झाल्याचे जाहिर करणे हे महाराष्ट्र सरकार मुबंईच्या झोपडपट्टीतील युवकांपासून तर गडचिरोलीच्या आदिवासीं पर्यंत संपूर्ण राज्य भर करीत आहे. कॉ. कृष्णा राजूरा येथिल शिवाजी कॉलेज मध्ये शिकत असतांनाच 2006 मध्ये क्रांतिकारी विद्यार्थि संघटनेच्या संपर्कात आला. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्यामुळे काम करुन शिक्षण करावे लागत होते. सर्वहारा वर्गातच जन्म झालेला स्वतः कामगार बणूनच शिक्षण घेत होता. आपल्या गरिबीचे व जनतेच्या प्रश्नाचे उत्तर तो आध यात्मामध्ये शोधत होता पण विद्यार्थि आंदोलनाव्दारे त्याला नवी दृष्टि मिळाली व तो हळू–हळू वैज्ञानीक दृष्टिकोणाकडे

वळला. नंतर त्याला कळले कि गरीबी–अमीरी ही काही देवाची देन नसून वर्गीय समाजाची देन आहे. व सत्तेवर असलेल्या वर्गाने त्यांच्या ताकतीचा वापर करुन जनतेला लुटून ते श्रिमंत बणले आहेत. तेंव्हा वर्ग संघर्ष हाच यातून बाहेर निघण्याचा मार्ग आहे.

जेंव्हा तात्वीक दृष्टया त्याला हे पटले तेंव्हाच तो 2008 मध्ये भारताची कम्युनिस्ट पार्टी(माओवादी) मध्ये सामील झाला. त्याला 2010 ला पार्टीची सदस्यता देण्यात आली. सुरुवातीला क्रांतिकारी विद्यार्थि चळवळीमध्ये कार्य केल्यानंतर क्रांतिच्या प्रधान संघर्षामध्ये जाण्याचा मानस पक्का केला व गडचिरोली जिल्हयामध्ये सशस्त्र संघर्षा मध्ये 2010 मध्ये सामील झाला. अत्यंत मेहनती व दृढसंकल्पी असल्यामुळे त्याला पिपुल्स गुरिल्ला लिबरेशन आर्मी मध्ये महत्वपुर्ण सदस्य म्हणून स्थान मिळाले. पीएलजीएच्या प्लाटून 56 मध्ये त्याने सदस्या पासून तर सेक्शन डेप्यू. कमांडर पर्यंत विकास केला. सशस्त्र संघर्षात शेवटच्या स्वासापर्यंत जनतेच्या मुक्ति करीता तो लढत राहीला. त्याच्या या चार वर्षाच्या काळात त्याने गडचिरोली, गोंदिया आणि राजनांदगांव जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातिल

जनतेमध्ये क्रांतिकारी विचाराचा प्रचार करण्याचे व जनतेला आंदोलनात संघटीत करण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे सरकारने जनतेविरुध्द सूरु केलेल्या युध्दाच्या प्रतिरोध ाातही तो सक्रियपणे भाग घेत होता. या काळात झालेल्या सर्वच 'टीसीओसी'(टैक्टिकल काऊन्टर अफेन्सिव कॅम्पीयन किंवा डावपेचात्मक प्रति आक्रमण) मध्ये त्याने भाग घेतला होता. या व्यतिरिक्त पीएलजीए ने केलेल्या ॲम्बूश मध्येही त्याची सक्रिय भूमीका राहीली. 2012 मध्ये देवरी क्षेत्रात पोलीसांनी डेऱ्यावर हल्ला केला तेंव्हा कृष्णाने त्यांचा जोरदार प्रतिकार करित दुश्मनांना थोपवून धरले व अन्य साथिंना सुरक्षित केले. या युध्दात तो जख्मी झाला होता. हाताला गोळी लागली होती पण तरिही न डगमगता जवाबी फायरिंग करित होता. शेवटी जेंव्हा त्याला कळले की आपले सहकारी सुरक्षीत निघाले आहेत तेंव्हाच त्याने तिथुन माघार घेतली. त्याचप्रमाणे कोरची परिसरात पोलीसांनी रात्रि हल्ला चढविला तेंव्हाही प्रतिउत्तर देतांना कृष्णा पुढे होता. सरकार जबरदस्तीने आगरी लोह प्रकल्प सुरु करण्याच्या बेतात असतांना, जनतेला जागृत करण्याचे कार्य करित असलेल्या प्रचार

टिम वर पोलीसांनी अचानक गोळीबार केला तेंव्हा सर्वांचे संरक्षण करण्याकरीता पोलीस आणि आपले कॉमरेडस् यांच्या मध्ये तो सुरक्षा भिंत बणून उभा ठाकला. कवर घेवून पोलीसांवर असा मारा केला कि पोलीस पुढे सरकू शकले नाही. अश्या रितीने गुरिल्ला नीतिचा योग्य वापर करित त्यांने सर्व कॉमरेडला किलींग झोन मधुन बाहेर काढले. 2012 मध्ये खोब्रामेंडा पहाडावर नेतृत्वाला खत्म करण्याच्या उद्देशाने पोलीस चालून आले असता वेळी कृष्णाच सेन्ट्री करित होता तेंव्हा दुश्मनांना बघुन त्याने फायर केले पण त्याची बंदूक फायर झाली नाही. तेंव्हा जराही न डगमगता सात वेळा बंदूक लोड करुन शेवटी सातवी गोळी फायर केली त्यामुळे सर्व साथी अलर्ट झाले व दुश्मनांचा प्रतिकार केला व नेतृत्वाला सुरक्षीत बाहेर काढले. 2013 मध्ये शत्रुंच्या दमन अभियानाचा प्रतिकार करण्यास ॲम्बुशची तैयारी केल्या गेली होती पण शत्रुला याचा सुगावा लागला व त्यांनी काऊन्टर ॲम्बुश केले तेंव्हा ज्या सेक्शन मध्ये कृष्णा होता त्यांच्यावरच रॅपीड फायरींग झाली तेंव्हा अन्य कॉमरेडस् सोबत जोरदार प्रतिकार करित संपुर्ण सेक्शनला सुखरुप रिट्रट करण्यात

कॉ. कृष्णाने महत्वपुर्ण भूमीका निभाविली होती. मधल्या काही काळात त्याने नेतृत्व रक्षणाची जबाबदारी सुध्दा सांभाळली. अश्या प्रकारे कृष्णा एक बहाद्दुर क्रांतिकारी गुरिल्ला जनयोध्दा होते.

कृष्णाला खाली बसने आवडत नव्हते. तो सतत काही ना काही काम करायचा. विशेष म्हणजे अंग मेहनतीच्या कामात कितीही अडचणी असल्या तरी तो कधीही मागे पाहात नव्हता. आपली शरीरयष्टी सूदृढ ठेवण्याकरीता तो सतत मेहनत घेत होता. त्याचप्रमाणे वैचारीक विकास करण्याकरीता सतत वाचन व चिंतन करीत असे. वरीष्ट नेतृत्वाची भेट झाल्यावर आवार्जुन येवून वेळ काढून चर्चा करीत असे. त्याला जे काही प्रश्न असे तो ते नेतृत्वासोबत आपले तर्क देवून सादर करीत होता व तर्काच्या आधारावरच समजूनही घेत होता. वैचारीक संघर्ष करीत तो आपली बौध्दीक क्षमताही विकसीत करीत होता. त्याच्या अंगी असलेले मेहनती गुण व शांत स्वभाव तसेच आपल्या सभोवती असलेल्या कॉमरेडस् मध्ये सतत राजकीय चर्चेचे वातावरण ठेवण्यास प्रयत्नशिल राहात होता. त्यामुळे प्लाटून मध्ये तो सर्वांचा

प्रिय झाला होता. जनते सोबतही त्याचे जिव्हाळ्याचे संबध होते.

जनतेच्या प्रश्नावर संघर्षामध्ये जनतेला संघटीत करण्याकरिता तो रात्रंदिवस ऑर्गनाईजींग दलांसोबत फिरायचा. प्रामुख्याने कोरची, कुरखेडा व देवरी तालुक्यामध्ील जनतेच्या आंदोलनामध्ये कॉ. कृष्णाचा सक्रिय सहभाग होता. कोरची जवळील आगरी पहाडीला खोदून देशातील दलाल भांडवलदारांच्या कंपन्या टपल्या असतांना जनतेने येथे जोरदार प्रतिरोध केला. या प्रकल्पामुळे जनतेचे विस्थापण मोठ्या प्रमाणावर होणार होते. तसेच पर्यावरणाचे नुकसानही मोठे होणार हे निश्चित. जनतेवर आलेले संकट ओळखून पार्टीने या विरोधात संघर्ष करण्याचे जनतेला आवाहन केले. आदिवासींच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला होता. यावेळी पार्टीने जनतेला चेतनाबध्द करण्याकरीता विशेष कार्यकर्त्यांची नेमणूक केली होती त्यात कॉ. कृष्णा एक होते. आजवर हा प्रकल्प जनतेने आपल्या एकतेच्या बळावर थोपवून धरला आहे. या संघर्षात कॉ. कृष्णाचे योगदान मोलाचे आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील आंदोलनामध्येही कृष्णाचा सहभाग होता.

अतिवृष्टी व शेती मालाला योग्य भाव मिळावा याकरीता जे आंदोलन 2010 ते 2014 या काळात झाले त्यात कृष्णाने हिरहिरीने भाग घेतला. सदैव जनतेचा विचार करणारा एक जिव्हाळ्याचा मुलगा शहीद झाल्यामुळे या परिसरातील जनता खूप हळहळ व्यक्त करीत आहे. त्याचसोबत कृष्णाची हत्या करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या विरोधात क्रोध व्यक्त केल्या जात आहे. गावां–गावांत कृष्णाला ओळखणारे हजारो युवक व युवतींनी तसेच मिलिशियाचे योध्दा यांनी कृष्णाच्या हत्येचा बदला घेण्याची शपथ घेतली आहे. कृष्णाचे स्वप्न साकार करण्याचा दृढसंकल्प प्रत्येक गावांगावांत व पीएलजीए मध्ये व्यक्त करण्यात येत आहे.

जीवन सगळेच जगतात. पण या जगण्यात स्वातंत्र, समता, बंधुता व आत्मसम्मान नसेल तर ते जीवन जनावरापेक्षाही निपटार होते. उत्पादनाचे साधने व सत्ता सर्वांवर अमिरांचा अधिकार आहे. अश्या या व्यवस्थेत जेंव्हा रोजगारच नाही तर सामाजीक शांतता कशी राहणार? कॉमरेड कृष्णाला या शोषण व दुखःचे मर्म कळले होते. भारतात जरी लोकशाही असल्याचे बोलले जाते तरी ही

लोकशाही भांडवलदारांकरीता आहे व जनतेकरीता ती घोर हुकूमशाही आहे. सत्ताधाऱ्यांनी पोलीसांकरवी जनतेचे आर्थिक, सामाजीक व सांस्कृतिक असे सर्व अधिकार हिरावून घेतले आहे किंवा त्याला कन्ट्रोल केल्या गेले आहे. सत्तेने पोलीसांना अत्याधुनिक शस्त्र देवून जनतेला निशस्त्र केले आहे. भारतात जनता विरुध्द शाशन व्यवस्था असा संघर्ष आहे तेंव्हा सरकार काय जनतेचे भले करणार खरी समस्या ही शाशन व्यवस्थाच आहे. तेंव्हा या विरोध ाात केवळ जनसंघर्षाने बदल होणार नाही तर जनसंघर्षा सोबतच सशस्त्र संघर्षाचीही अत्यंत गरज आहे. हे तो केवळ समजत होता असे नाही तर त्याकरीता त्याने स्वतः विद्यार्थि संघर्षात व नंतर एक गुरिल्ला जनयोध्दा बणून, सशस्त्र संघर्षात सक्रिय भाग घेवून, आपले सर्वोच्च बलिदाण करुन, जीवन सार्थक करुन दाखविले. त्याने युवकांपूढे एक आदर्श स्थापित केला. जनतेकरीता सर्वस्व अर्पण करण्याचा! देशाला एक समानतावादी देश बणविण्याकरीता, देशाला साम्राज्यवाद्यांच्या पाशातुन मुक्त करण्याकरीता त्याने बलिदान केले. तो खरा देशभक्त आहे! त्याने आपल्या आईच्या पोटी जन्म घेतला पण

त्याने आपल्या कार्यातुन हजारो मातांच्या हृदयात जागा मिळविली व तो हजारो मातांचा सुपुत्र बणला. तो स्वतःकरीता नाही तर समाजाकरीता जगला, समाजाकरीता लढला व समाजाकरीताच त्याने बलिदान केले. त्याचे स्वप्न होते भारतात असा समाज निर्माण करण्याचे ज्यात जनतेचे राज्य राहील. सामाजिक शांतता नांदेल, सर्वांना काम व कसेल त्याला जमिन असणार. माणूस माणसाचे शोषण करणार नाही. आणि त्याने चांगल्या तऱ्हेने समजले होते कि, देशातिल दलाल भांडवलदार व जमिनदार वर्ग जे साम्राज्यवाद्यांच्या निर्देशनात राज्य करीत आहे ते एवढ्या सहजासहजी सत्ता जनतेच्या हातात देणार नाही. त्याकरीता दिर्घ संघर्ष करावा लागेल. जोपर्यंत जनतेही ला शस्त्र बाळगण्याचे अधिकार दिल्या जात नाही तोपर्यंत खरी लोकशाही नांदूच शकत नाही. जोपर्यंत उत्पादनाचे साधन व संपत्ती वर जनतेचा अधिकार स्थापीत होत नाही तोपर्यंत देशात शांतता स्थापित होवूच शकत नाही. या करीता जनतेला आपली सेना मजबूत करुन सत्ताधाऱ्यांविरुध्द जनयुध्द केल्याशिवाय पर्याय नाही. माओवादी पार्टीच्या नेतृत्वात देशभर चालू असलेल्या जनयुध्दात

संपूर्ण जनतेने आपआपल्या क्षमतेनुसार सामिल होणे गरजेचे आहे. हेच भारताचे भविष्य आहे. पी.एल.जी.ए. चा लडाकू योध्दा असल्याचा त्याला अभिमान होता. तो नेहमी म्हणायचा कि जर मला पार्टी मिळाली नसती तर माझे जीवन व्यर्थ असते. आज माझ्या जीवनाला अर्थ आहे. खरोखर भारताच्या क्रांतिकारी इतिहासाचा तो आज अविभाज्य भाग बणला आहे. एक अर्थपूर्ण जीवन जे सदैव जनतेच्या स्मरणात राहिल.

विद्यार्थि संघर्षात असतांना अभिव्यक्ति स्वातंत्र्या विषयी विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले त्यात कृष्णाने हिरहिरीने भाग घेतला होता. कामगारांना क्रांतिकारी चेतना देण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या 'इंडस्ट्रियल कैम्पीयन' मध्ये तो सक्रियपणे सहभागी झाला होता. तसेच 'गांव चला मोहिमेतही' त्याने भाग घेऊन शेतकऱ्यांशी जवळीक साधली होती. विद्यार्थ्यां मध्ये काही संधीसाधू वैचारिक मतभेद तैयार करुन विद्यार्थि आंदोलनाला बोथट करण्याचा प्रयत्न करित होते त्यावेळी वैचारिक संघर्षात भाग घेवून अशांना चपराक देण्यात मागेपुढे पाहत नव्हता. तेंव्हा संविधान व संघर्षाला एक दुसऱ्याच्या विरोधात उभे

करणारे वैचारीक संघर्ष विद्यार्थ्यांत होत होते. त्यात तो आर्वाजून भाग घेत होता. संविधानात कितीही चांगल्या तरतुदी असल्या तरी त्या शोभेच्या वस्तू आहेत. केवळ कागदावर लिहील्याने हक्क मिळत नाही तर ते मिळविण्याकरीता संघर्ष करावा लागतो. संविधानामध्येही ज्या सवलती दलित व आदिवासींकरीता दिलेल्या आहेत त्याला देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील दलितांच्या लडाकू संघर्षाची व आदिवासींच्या लडाकू संघर्षाची पार्श्वभूमी आहे. शिक्षण व संघर्ष हे बाबासाहेबांचे दोन हत्यारं होते. जर केवळ बौध्दीकताच जोपासली व संघर्ष केला नाही तर त्याचे अपेक्षीत फळ मिळणार नाही. केवळ पोकळ भाषण देणारे व कृति करणारे यांचे वर्णन भुंकणारे व चावणारे असा तो करायचा. कुष्णा बाबासाहेबांचे ते वक्तव्य आवार्जुन आठवण करुन द्यायचा कि,'जर हे संविधान भारतात आर्थिक, सामाजिक व राजकिय समानता आणू शकले नाही तर याला जाळणारा पहिला व्यक्ति मीच राहिल.' आज खरोखर हे घोषवाक्य दलित व शोषीतांकरीता मार्गदर्शक आहे. सत्तेवर बसलेल्यांनी भारताच्या संविधानाला 100 पेक्षा जास्त वेळ बदलवून

साम्राज्यवाद्यांच्या व दलालांच्या हिताची बणवून टाकली आहे. जी काही प्रावधाने त्यात जनतेकरीता होती त्यावर अमंल केल्या जात नाही किंवा नाममात्र केल्या जाते. देशातील राजकिय परिस्थिती आज एकदम स्पष्ट आहे. आज संघर्षच प्रधान प्रवृत्ती आहे. जनतेच्या हाती सत्ता नसेल तर काहिच नाही. देशभर जनतेचे चालू असलेले क्रूर शोषण व राज्य सत्तेव्दारे केल्या जात असलेले अमानुष दमन आवार्जुन सांगत आहे कि भारताला क्रांतिची गरज आहे. तेंव्हा ही वेळ पोकळ चर्चा करीत बसण्याची नव्हे तर क्रांतिकारी संघर्षात उडी घेऊन शौर्य गाजविण्याची आहे. आपल्या चर्चेतुन कृष्णा युवकांना आवार्जुन क्रांतिकारी संघर्षात सामिल होण्याचे आवाहन करित होता. आज तो आवाज जरी नसला तरी त्याचे प्रतिध्वनी सतत गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व राजनांदगांव जिल्ह्यातिल गांवागावांत, शिवारात, डोंगर दऱ्यात, जंगलात व कॉलेज मध्ये शिकणाऱ्या क्रांतिप्रवण तरुणांत गुंजत आहे.

असा हा लडाकू, दृढसंकल्पी व जनतेकरीता सर्वस्व अर्पण करणारा जनयोध्दा शहीद झाल्यामुळे क्रांतिकारी आंदोलनाचे मोठे नुकसान झाले आहे. जनतेच्या या प्रिय

लेकराला लाल–लाल सलाम! कॉ. कृष्णा अमर आहे! त्यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यास त्यांच्या शहादती पासून प्रेरणा घेवून हजारो युवक पूढे येतील व कृष्णाचे स्वप्न साकार होईल.

कॉमरेड कृष्णा अमर आहे!

**★ कॉ.कृष्णाचे स्वप्न साकार करण्यास क्रांतिकारी विद्यार्थि चळवळ उभारा आणि पि.एल.जी.ए. मध्ये भर्ती व्हा!**

**★भारताची कम्युनिस्ट पार्टी(माओवादी) जिंदाबाद!**

**★पिपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी जिंदाबाद!**

**★ क्रांतिकारी जन कमेट्या (जनताना सरकार) जिंदाबाद!**

**★नवजनवादी क्रांति जिंदाबाद!**

# भारताची कम्युनिस्ट पार्टी(माओवादी)

# चे

# युवकांना आवाहन!

कॉमरेड कृष्णाचे अपुर्ण स्वप्न पुर्ण करण्यास क्रांतिकारी संघर्षात सामिल व्हा! आपल्या देशाला आज परत गुलाम बणविल्या जात आहे. 1947 ला प्रत्यक्ष ब्रिटिश वसाहत समाप्त होवून साम्राज्यवाद्यांचे अप्रत्यक्ष शाशन–शोषण–नियंत्रण स्थापण झाले. ब्रिटिशांच्या जागी भारतीय दलाल भांडवलदार व जमिनदार वर्ग सत्तेवर बसला. व गेल्या 68 वर्षापासून तो भारतीय जनतेचे शोषण करित आहे. जनतेने या स्वातंत्र्याला सुरुवाति पासूनच खारिज केले. स्वांतत्र्याच्या बोहल्यावरच देशाची फाळणी व त्यातुन घडवून आणलेल्या दंगलिमध्ये हजारोंचा जनसंहार, जमिनी करिता लढणाऱ्या तेलंगणातिल शेतकरी व त्यांच्या कम्युनिस्ट नेतृत्वांचा जनसंहार, स्वातंत्र्यानंतर आजवर सहा कोटी पेक्षाही जास्त असे आदिवासी व जनतेचे देशी दलाल व विदेशी कंपन्यांच्या प्रकल्पा करिता

केलेले विस्थापण, लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कामगारांचे खच्चीकरण, 1984 मध्ये सुर्वण मंदिरावर भारतीय सेनेचा हल्ला, नंतर हजारो शिखांचे जनसंहार, 2002 मध्ये गुजरात मध्ये मुस्लिमांचे जनसंहार, त्या आध ी अयोध्या कांडा निमित्त देशभर कट्टर हिंदूत्ववाद्यांनी केलेले मुस्लिमांचे हत्याकांड, दलितांवरील जातिय व सरकारी प्रशाशनिक हल्ले, महिलांवरील अत्याचार व आदिवासींवरील सत्तेचे हल्ले याविरुध्द जनता सतत संघर्ष करीत आली आहे.

भारतातील जनतेची मुलभूत समस्या जमिनीची आहे. 'कसेल त्याला जमिन व सर्व सत्ता जनतेच्या हाती' या नाऱ्याला घेवून नक्षलबारीच्या शेतकऱ्यांनी उठाव करुन देशाला क्रांतिची खरी दिशा दिली. यावर सत्ताध ारी वर्गाने सुरुवातीपासूनच हल्ले चढविले. पण सरकारी हल्यांना सडेतोड प्रतिउत्तर देत क्रांतिकारी जनतेने आजवर हा लढा रेटून धरला आहे. अप्रतिम बलिदानातुन क्रांतिकारी जनतेने जनतेच्या राज्याचे भ्रूण रुप दंडकारण्य व झारखंडच्या ग्रामिण भागात स्थापण केले आहे. क्रांतिकारी आंदोलनाची भारतातिल आजवर गाठलेली ही उच्च

मजल आहे. गेल्या 45 वर्षाच्या सशस्त्र संघर्षात 12 हजाराहुन जास्त कॉमरेडस्ने या क्रांतियुध्दात अमरत्व पत्करले आहे. भाकपा(माओवादी) ची रणनीति आणि कार्यनीति या जनयुध्दाने प्रमाणीत केली आहे.

माओवादी पार्टीने सुरुवाती पासुनच भारतीय क्रांतिला अचुक दिशा दिली. भारतातील सत्ताधारी वर्ग हा दलाल नौकरशहा भांडवलदार आणि जमिनदार वर्ग आहे व हे साम्राज्यवादांचे दलाल आहेत. भारत हा अर्धसरंजामी व अर्ध वसाहती देश आहे. भारतात ब्राम्हणी विचारधारेवर आधारित जातिय ढाँचागत असलेली सरंजामी व्यवस्था आहे व या व्यवस्थेला जोपासीत साम्राज्यवाद शोषण करीत आहे. या शोषणाला अबाधित ठेवण्याकरिता सत्ताध ारी वर्गाने अत्याधुनिक सेना व पोलीस–प्रशासन तैयार केले आहे. मुठभर असलेले हे खरबपती, अरबपती व करोडपती देशाच्या सर्व साधन व संपत्तीवर कब्जा करुन आहेत. हे केवळ सैनिकी ताकतिच्या बळावर राज्य करीत आहे. जनतेने यांना सत्तेतुन खेचुन काढण्यास कित्येक देशव्यापी लढे व उठाव केले पण योग्य नेतृत्व व लढण्याच्या योग्य दिशे अभावी ते असफल झाले. करीता सर्व लढ्याचा

व सत्तेच्या प्रत्येक अंगाचा अभ्यास करुनच माओवादी पार्टीने दिर्घकालिन जनयुध्दाची रणनीति व डावपेच आखले आहे.

आपल्या देशात कामगार व शेतकरी वर्गा व्यतिरिक्त दलित, आदिवासी, महिला, धार्मिक अल्पसंख्यांक व विभीन्न राष्ट्रीयता आहेत ज्यांच्यावर साम्राज्यवादी, दलाल नौकरशहा भांडवलदार आणि सरंजामी शोषणाचा पाश आवळला आहे. यातुन या सर्वांची मुक्ति करण्याकरिता भारतात नवजनवादी क्रांति सफल करणे गरजेचे आहे. ही क्रांति शेतकऱ्यांना सावकार व बँकांच्या कर्जातुन मुक्त करेल, कसेल त्याला जमिन बहाल करेल, सर्व साम्राज्यवादी आणि दलाल नौकरशहांचे व जमिनदारांचे खाते व संपत्ती जप्त करुन ती जनतेची संपत्ती म्हणून घोषीत करणार. देशाला खऱ्या अर्थाने समाजवादी देश बणविल्या जाईल. कारखाने कामगारांच्या मालकिची केल्या जाईल व प्रत्येक कारखान्यांवर कामगारांच्या कमेटीचा अधिकार राहिल. आपल्या पार्टीचे असे मत आहे कि जनतेकडून एकत्रित केल्या जाणारा टॅक्स देशातिल जनतेला सेवा व सुविधा पुरविण्यास पुरेसा आहे करिता सर्वांना मोफत शिक्षण,

स्वास्थ सुविधा व अन्य सोई राहणार. वेगवेगळ्या नावाखाली प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष टॅक्स वसूल करुन जनतेची जी पिळवणूक या व्यवस्थेत केल्या जात आहे ती पुर्णपणे बंद केल्या जाणार. जनतेला सामाजिक शांतता व बंधुता केवळ नवजनवादी राज्यातच मिळेल. वर्गिय दृष्ट्या हे राज्य कामगार व शेतकरी वर्गाच्या मजबूत एकतेच्या आधारावर निम्न भांडवली व राष्ट्रिय भांडवली वर्गाचे मिळून बनलेल्या संयुक्त आघाडीचे असेल. त्यामुळे या राज्यात सर्वांच्या विकासाची खरी हमी असणार. पण हे तेंव्हाच शक्य आहे जेंव्हा या वर्गातिल तरुण शक्ति स्वतःला क्रांति कार्यात झोकून देतील.

तरुणांनो, देशात जनयुध्द चालू आहे ही वास्तविकता आहे. कित्तेक तरुण या महान ध्येयासाठी आपले अमुल्य प्राण अर्पण करित आहेत. तेंव्हा चला, लाचारिचे जगणे जगण्यापेक्षा शौर्य गाजवून इतिहासात आपले नाव अजरामर करा. प्रत्येक ठिकाणी संघटना बांधा. कामगार, शेतकरी, महिला, बुध्दिजीवी, विद्यार्थि, सांस्कृतिक व सर्व समुह व कामाच्या प्रकारांमध्ये आपआपल्या संघटना बांधा व आपल्या मागण्यांपासुन संघर्ष सूरु करा. सर्व संघर्ष व संघटनांना

क्रांतिकारी संघर्षाचा भाग बणवा. जात निर्मुलना करिता विशेष संघटना निर्माण करा. जातियता आपल्या समाजाला लागलेला रोग आहे त्याचा नायनाट करण्यास दलितांसमवेत प्रत्येकांनी लढावे लागणार.

दुसऱ्या विश्वयुध्दानंतर जगातिल सर्व साम्राज्यवाद्यांनी राज्य करण्याच्या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल केले. ते स्वतः राज्य न करता दलालां मार्फत राज्य करित आहेत. पण केवळ राज्यात असणारा वर्गच राज्य करतो असे नाही तर त्यांनी जनतेत सुध्दा राज्याला समर्थन देणारी यंत्रणा निर्माण केली आहे. ही यंत्रणा म्हणजे एन.जी.ओ. हे गैर सरकारी संघटन खऱ्या अर्थाने सरकारी व्यवस्था सांभाळणारी व्यवस्था आहे. ही युवकांना क्रांतिकडे जावू देत नाही. हे सांघटनिक व वैचारिक रित्या युवकांना गुंगित ठेवण्याचे काम करित आहे. तोंडात क्रांतिकारी विचार व कृती सुधारवादाची किंवा गांधीवादाची असते या पासून युवकांनी सावध राहावे. बोलण्यात व कविता लिहिण्यात क्रांतिकारी असून चालत नाही तर कृती आवश्यक आहे. समाजात बोलणे व देखावे करणाऱ्यां पोकळ भोंदूंचा सुळसुळाट आहे. हे वेगवेगळ्या सन्मानात

व पुरस्कारात विकल्या जातात. क्रांतिकारी तरुणांनी यांच्याकडून मान्यता मिळविण्याची किंवा त्यांच्या चौकटित ओळख निर्माण करण्याच्या व्यर्थ कामात वेळ खर्च करु नये. आपला बहुमुल्य वेळ सरळ शोषीत जनतेत घालवावा. दहा प्रस्थापित साहित्यकारांच्या टोळक्यात बसण्यापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन कार्यात लागलेल्या एका कष्टकऱ्यांत क्रांतिची चेतना जागविणे शंभर पटीने मोलाचे आहे. व ही चेतना जागविणारी कविता, गाणे लिखाण याची साद कष्टकरी जनता तुम्हाला आंदोलन उभारुन देईल तो खरा तुमचा संम्मान आहे. तरी युवकांनी रंगबेरंगी एनजीओ च्या कुचक्रा पासून सावाध राहावे.

देशात ब्राम्हणी हिंदू फासिवादाने नव्या दमाने डोके वर काढले आहे. त्याला समतावादी विचारच इलाज आहे. हे फासीवादी सरळ हल्ले करित आहेत. यांच्या विरुध्द निवेदने व सम्मेलने केल्याने भागणार नाही. व्यापक जनतेला रस्त्यावर उतरवून लडाकू आंदोलने करावी लागतिल. त्याचप्रमाणे या ब्राम्हणी हिंदू आतंकवाद्यांचा मुकाबला करण्यास गुरिल्ला पध्दतीने कार्य करणारे क्रांतिकारी युवकांचे गुप्त दले ग्रामिण भागाप्रमाणेच शहरातही

निर्माण करावे लागणार. तुम्ही सरळ पी.एल.जी.ए. मध्ये भर्ती होवू शकता किंवा आपल्याच शहरात युवकांचे गुप्त संघटन बांधुन देखील क्रांतिकारी कार्य करु शकता.

सरकारी मशनरी बऱ्याच अंशी ब्राम्हणी हिंदू फासीवादी आहे. या सिस्टम मध्ये असलेला मग तो मागास वर्गातला जरी असेल तरी तो तेवढाच क्रूर व प्रतिगामी आहे. हे कित्तेक वेळा जनतेवर शाशनाने केलेल्या हल्यातुन दिसून आले आहे. ब्राम्हणी हिंदू फासीवादाला ठेचुन काढण्यास व्यापक संयुक्त मोर्चाची गरज आहे. सर्व धर्म निरपेक्ष व खऱ्या लोकशाहीवादी शक्तिंना आपण एकजूट करण्यास शर्थिचे प्रयत्न केले पाहिजे. जेंव्हा वेगवेगळ्या विचारांच्या संघटना एकत्र येतात तेंव्हा नाहक एक दुसऱ्याचे विचार कसे श्रेष्ठ आहे हे दर्शविण्यातच स्वतःला धन्य समजतात. हे सर्व वेळ काढू कामे करण्यापेक्षा विषयांवर आधारीत कृती करण्याकडे कल असावा. त्या दृष्टिने आपले प्रयत्न असायला पाहिजे.

माओवादी ही देशात खरी लोकशाहीवादी शक्ति आहे. भारतीय शाशक वर्गाने माओवादींच्या नावावर देशभऱ्यात जे 'ऑपरेशन ग्रीन हंट' नावाने जनते विरुध्द

युध्द सुरु केले आहे, ते केवळ माओवादी असलेल्या क्षेत्रातच नाही तर संपूर्ण भारतभर आहे. सत्ताधाऱ्यांना माओवादाची भिती निर्माण झाली आहे. त्यांनी स्वतः निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे जनता येवढी त्रस्त झाली आहे कि जंगला–गांवापासून तर शहरांपर्यंत जनता आपआपल्या परिने संघर्ष करित आहे. हे सर्व संघर्ष व्यापक स्वरुपाने भारताच्या नवजनवादी क्रांतिच्या संघर्षाचेच भाग आहेत. माओवादी पार्टी जवळ असलेली वैचारिक, व्युहरचनात्मक–डावपेचात्मक, संघटनात्मक अचुक दिशा व सशस्त्र संघर्षातुन तावून सलाखून निघालेले नेतृत्व आहे जे देशातिल या संघर्षाला क्रांतिमध्ये परावर्तित करु शकतात यामुळे सत्ताधारी घाबरुन गेले आहेत. व ते कावरा–बावरा होवून जनतेच्या हत्या करित आहेत. छत्तीसगढ़, आंध्रा, तेलंगणा, ओडीशा, झारखंड, बिहार, पश्चिम बंग व महाराष्ट्रा येथेही जनतेच्या हत्या केल्या जात आहे. माओवादी आंदोलनाला दाबून टाकण्यास पाच लाखावर अर्धसैनिक बले तैनात केली आहेत. माओवादी, काश्मीर व उत्तर पुर्वेतिल राष्ट्रीय मुक्ति चळवळी तसेच देशभऱ्यातिल कामगारांच्या चळवळींना बंदूकिच्या जोरावर

दाबून टाकण्याकरिता भारताची अर्धी सैन्य शक्ति जवळपास 22 लाख बले जनते विरुध्द तैनात केली आहे. ज्या देशातील अर्धी सेना स्वतःच्याच नागरीकांवर गोळ्या झाळण्यास तैनात आहे तो देश खरच लोकशाही असू शकतो काय? त्यांनी क्रांतिकारींवर बहुमुखी दमन चालविले आहे. यांत जनसंहार करने, हत्या करणे व चकमक झाल्याचे जाहिर करणे, गायब करणे, महिलांवर अत्याचार, कित्तेक निर्दोष लोकांना कैदेत ठेवणे, त्याचप्रमाणे जनतेतिल एका गटाला भ्रष्ट बणवून व्यापक जनतेविरुध्द उभा करणे, वैचारिक व मानसिक युध्द चालविणे, आंदोलनाला बदनाम करण्याचे षडयंत्र करणे, घेराव व सर्चिंग करुन पिकांची व संपत्तीची नासधुस करणे चालू आहे. एकीकडे असा सरकारी आतंक चालू असतांना स्वतःला लोकशाहीवादी समजणारे राज्य आतंकाच्या विरुध्द सरळ–सरळ बाजू घेण्यापेक्षा हिंसा–अहिंसेच्या चर्चा मांडून चमडीबचावू भूमीका घेत आहे. क्रांतिकारी जिवावर उदार होवून जनतेकरिता युध्द करित आहे व हे संशोधनवादी, गांधीवादी, उत्तर आधुनिकतावादी माओवादींना हिंसक म्हणून राज्य हिंसेला समर्थन देत आहे. हे पुरोगाम्याच्या

वेशातील सरकारी एजंट आहेत. या पासून युवकांनी सावध होणे गरजेचे आहे. हे असे विचार आहेत जे अन्याया विरुध्द उठणाऱ्या युवकांच्या सळसळत्या रक्ताला थंड करण्याचे काम करतात. वर्गिय समाजात संघर्षरत शोषीत जनतेच्या बाजूने उभे राहणे हीच खरी मानवता आहे. मानव अधिकारासाठी कार्य करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे कि फासीवादी राजवटी मध्ये मानव अधिकारासाठी लढणे सुध्दा साधारण नाही. हा संघर्ष सुध्दा व्यापक क्रांतिकारी संघर्षाचा भाग आहे असे आम्ही समजतो.

भारत आज जगातिल सर्वात युवा देश आहे. युवकांना रोजगार हवा आहे. सरकारचे धोरण किंवा मोदींचा 'मेक इन इंडिया' रोजगाराचे धोरण नसून विदेशी साम्राज्यवादी कंपन्याना मुनाफा देन्याचे आहे. प्रचंड बेराजगारी ओरडून सांगत आहे कि देशाला क्रांतिची नितांत गरज आहे. सरकार युवकांना रोजगार देवू शकत नाही करिता त्यांना गुंगित ठेवण्यास, भोगवादी मुल्य, सांप्रदायीक व जातिय दंग्याचे विष पसरवित आहे. बेरोजगार युवकांना राजकिय पाटर्यांचे फुट सोल्जर बणवून त्यांचा जनते विरुध्द वापर करित आहे. नरेन्द्र मोदी देशभक्तिच्या नावाखाली

वास्तविकपणे देशाला पुर्णपणे आर्थिक गुलामित ढकलत आहे. त्यामुळे युवा शक्तिने सजग होवून आपल्या देशाला वाचविण्यास, आपल्या भविष्याला सुरक्षीत करण्यास जनयुध्दात उतरणे गरजेचे आहे.

कॉमरेड कृष्णा तुमच्यापैकिच एक होता. त्याने आपले कर्तव्य पार पाडले. आता युध्द पुढे विजयाकडे घेवून जाणे आपले कर्तव्य आहे. करिता आम्ही सर्व युवकांना क्रांतिकारी संघर्षात सामिल होण्याचे आवाह्‌न करित आहो.

सह्याद्री
सचिव, महाराष्ट्र राज्य कमेटी,
भारताची कम्युनिस्ट पार्टी
(माओवादी)

# क्रांति गीत

क्रांति साठी जन्म आपुला
क्रांतिच निर्वाणिचे काम
मृत्युनेही गीत म्हणावे
क्रांति तुजला लाल सलाम!
तलवारीच्या पात्यावरती
आजन्म आपुली पाऊल वाट
संगिन आपुल्या खांद्यावरती
किती असूद्े अवघट घाट
क्रांतिच्या दुश्मनांनो ऐका
क्रांति साठी प्राण गुलाम
मृत्युनेही गीत म्हणावे
क्रांति तुजला लाल सलाम!
शस्त्रांचा खनखणाट होता
जनसैनिक हे धरतिल ताल
रक्ताचे शिंपण भूमीवर
क्षितिजही होईल लालम लाल

रवी उद्याचा निघेल न्हाऊनी
पूंजीपतींना करेल जाम
मृत्युनेही गीत म्हणावे
क्रांति तुजला लाल सलाम!
सैतानांना जाब पुसाया
सुटतिल तोफेचे गोळे
चालत राहतिल लालच सैनिक
क्रांतिकडे असतिल डोळे
वैरी सारे होतिल भयभित
होता अपुले काम तमाम!
मृत्युनेही गीत म्हणावे
क्रांति तुजला लाल सलाम!
क्रांति तुजला लाल सलाम!
क्रांति तुजला लाल सलाम!